MHST110004572023

**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५९/२०२३</u>**

**हरिभाऊ जवळ वै. : वादी**

**<u>विरुध्द</u>**

**सुरेश कदम वै. : प्रतिवादी**

## <u>आदेश नि. क्र ४८ करीता</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ०१ व ०२ तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यास दाखल कैफियतीमध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. ०१ व ०२ यांचे असे कथन आहे की, त्यांनी दाव्याच्या कामी म्हणणे व कैफियत दाखल केली आहे. परंतु, सदरचे कामी वादी यांनी दावा दुरुस्ती अर्ज दिलेला होता. त्या अर्जावर म्हणणे देतेवेळी माहिती घेताना सदरचे वादी व अन्य प्रतिवादी यांच्या वंशावळीबाबत व नातेसंबधाबाबत कैफियत टायपिंग करतेवेळी अनावधानाने त्रुटी झालेल्या आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्या नातेसंबधाबाबत दुरुस्ती करणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांचे पुढे असे कथन आहे की, सदरच्या दुरुस्तीमुळे कैफियतीच्या मुळ स्वरुपात कसलाही बदल होत नाही. उलट सदर दुरुस्तीमुळे वादी व प्रतिवादी यांच्या नातेसंबधाबाबत खुलासा होणार असुन न्यायाच्या दृष्टीने सदरची दुरुस्ती ही महत्वाची आहे. या दुरुस्तीमुळे वादींचे कसलेही नुकसान होणार नाही. सबब, प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे कैफियत कलम ५ मधील ओळ क्र. ०३, ०५, २२, २५, व ३० मध्ये, कैफियत कलम ०६ मधील ओळ क्र. ०९ व ०७ मध्ये तसेच, कैफियत कलम ०७ मधील ओळ क्र. ०६ व १२ मध्ये दुरुस्ती करणेस परवागनी मिळणेची विनंती केली.

०३. प्रस्तुतच्या अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. ५० कडे दाखल करुन अर्ज मंजुर करणेस तीव्र आक्षेप घेतला आहे. वादी यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांच्या अर्जातील संपुर्ण कथने खोटी व लबाडीची आहेत. प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल केल्यानंतर जवळजवळ १० महिन्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाव्याचे काम लांबणीवर टाकण्यासाठी दाखल केला आहे. सबब, वादी यांनी प्रस्तुत अर्ज रद्द करणेची व अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी जास्तीत जास्त वादखर्च करणेची विनंती केली.

०४. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले.

०५. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव, दावा कलम १ मधील मिळकतीचे वाटप व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जात ज्या दुरुस्त्या मागितल्या आहेत, त्या नातेसंबध, नांवे आणि इतर किरकोळ दुरुस्त्यांबाबत असल्याचे दिसुन येते. सदर दुरूस्त्यांपैकी काही दुरुस्त्या हया टंकलेखनातील त्रुटीमुळे व काही त्रुटया या अनावधानाने झालेचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चा आदेश ६ नियम १७ प्रमाणे पक्षकारांना खटल्याच्या कोणत्याही टप्प्यावर त्यांच्या अभिवचनांमध्ये (Plaint/Written Statement) दुरुस्ती करण्याची परवानगी न्यायालयास देता येते. प्रतिवादी यांनी कैफियतीमध्ये मागितलेल्या काही दुरुस्त्या हा टंकलेखनामुळे झालेचे व नाते संबधाबाबत असल्याचे दिसुन येते. सदरच्या दुरुस्त्या हया तांत्रीक स्वरुपाच्या असल्याचे देखील दिसुन येतात. प्रतिवादी यांनी कैफियतीमध्ये मागितलेल्या दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या बचावाच्या स्वरुपात कोणताही बदल होत नसल्याचे दिसुन येते. वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे निराकरण होण्यासाठी सदर दुरुस्तीने एक प्रकारे मदतच होणार आहे. तसेच, प्रस्तुत दुरुस्ती अर्ज जर मंजूर केला तर वादीचे कुठलेही नुकसान होण्याची शक्यता नाही. प्रस्तुत प्रकरण प्राथमिक

अवस्थेत आहे. दाव्यात अद्याप मुददे निश्चीत झालेले नाहीत. अशा उक्त परिस्थितीत प्रतिवादीचा कैफियत दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यात कुठलीही कायदेशीर बाधा निर्माण होत नाही. परंतु, प्रतिवादी यांनी विलंबाने दिलेल्या अर्जाचा देखील विचार होणे गरजेचे ठरते. प्रतिवादी यांनी प्रस्तुत दुरुस्ती अर्ज देण्यास जो विलंब केला आहे, त्याचे योग्य व संयुक्तिक कारण दिलेले नाही. त्यामुळे, वादीच्या जलद गतीने दावा चालविण्याच्या हक्कावर गदा आलेली आहे. त्यामुळे, प्रतिवादीचा अर्ज त्याच्यावर योग्य तो वाद खर्च लादुन मंजुर करणे योग्य व न्यायोचीत होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज (नि.क्र.४८) मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी या अर्जाचा वादखर्च म्हणुन रक्कम रुपये ५००/– (र.रु. पाचशे फक्त ) इतकी रक्कम वादी यांना देणेची आहे.

३. **प्रति**वादी यांनी आदेशाच्या दिनांकापासुन १४ दिवसाच्या आत कैफियतीमध्ये दुरूस्ती करुन दुरुस्त प्रत न चुकता दाखल करावी. जर सदरची दुरुस्ती व दुरुस्त प्रत उपरोक्त कालावधीत दाखल न केल्यास सदरचा अर्ज विनाशर्त नामंजूर करण्यात आल्याचे समजावे.

VIKRAM AMBADAS AVHAD

Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2026.07.22 17:42:35 +0530

**दिनांक** – २२.०७.२०२६ डॉ. विक्रम अं. आव्हाड,

**ठिकाण** – मेढा **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा**